# एप्रिल २०२४ चे राशी भविष्य - फाल्गुन मासात कृष्णपक्ष आणि चैत्र मासात शुक्ल पक्ष

**लेखक-अजय तनखीवाले**



**पार्श्वभूमी :**

**उत्सव:**

१७ एप्रिल -श्रीराम नवमी; २३ एप्रिल -हनुमान जयंती; ९ एप्रिलला गुढी पाडवा

**एप्रिल मधील महत्वाच्या तारखा:**

पौर्णिमा – २३ एप्रिल; अमावस्या - 8 एप्रिल रोजी, सूर्यग्रहण ८ एप्रिल - फक्त अमेरिकेत एकाच पट्ट्यात दिसेल.

**महिन्यातील गोचर ग्रह युती:** या महिन्यात ग्रह युती : १. मकरेत प्लुटो २. कुंभेत शनी, मंगल ३. गुरु, हर्षल मेषेत ४. राहू, नेपच्यून, बुध मीन मध्ये ५. केतू कन्या राशीत आहे.

## १ एप्रिल रोजी ची कुंडली व २३ एप्रिल ची कुंडली

| १ एप्रिल | २३एप्रिल ची कुंडली |
|---|---|
|  |  |

## भविष्य-चंद्र राशी प्रमाणे: (आपल्या चंद्र राशी (भारतीय पध्दती) प्रमाणे वाचा)

| राशी | भविष्य |
|---|---|
| **२. १ मेष राशी (Mesh):**<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>    • मंगल-शनी ग्रहयुती धुडगूस घालेल, स्वास्थ्य सांभाळा.<br>    • तरी गुरु-हर्षल साथ देतील.<br>    • ग्रहणात राहू प्रतिभेस काळिमा लावतो.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>    • ग्रहणात वाद निर्माण होईल.<br>    • संशयास्पद व्यवहार टाळावे.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>    • उगाच वाद घालू नका, घरात शांतता बाळगा.<br>    • हा महिना थोडा रटाळ आणि शुष्क असेल.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>    • पौर्णिमे जवळ चोरी नुकसानीची शक्यता.<br>    • धनसंपत्तीची नासधूस होईल.<br>• *इ . कौटुंबिक*<br>    • भार्येची काळजी करावीत.<br>• *फ . परदेश गमन*<br>    • जाण्याची दाट शक्यता. |
| **२.२ वृषभराशी (Vrishabha):**<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>    • स्वास्थ्य उत्तम असेल.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>    • या मासात आर्थिक ओघ वाढेल.<br>    • शत्रू जोर वाढवतील पण त्यांवर मात कराल.<br>    • पौर्णिमेजवळ वैयक्तिक छंद मोठी किर्ती मिळवून देतील.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>    • वाईट संगत टाळावी. ग्रहणात त्रास होऊ शकतो.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>    • ग्रहणाच्या वेळी मोठे नुकसान होईल, सल्लागारांचे मत घ्या.<br>• *इ . कौटुंबिक*<br>    • मुलांना संधी मिळत नाही, त्यांना मदत करा.<br>    • आई वडील सुखात असतील. |

| | |
|---|---|
| | • *फ . परदेश गमन*<br>  ◦ परदेश गमनास उत्तम संधी. |
| **२.3 मिथुन राशी (Mithun):**<br> | • *अ. स्वास्थ्य*<br>  ◦ या महिन्यात उत्तम स्वास्थ्य लाभेल.<br>  ◦ सूर्यग्रहणाच्या आसपास दुखापती वा इजा होण्याची शक्यता. काळजी घ्या.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>  ◦ पूर्वार्धात भरभराट होईल, एजंट पाठिंबा देतील.<br>  ◦ आपल्या नैसर्गिक स्वभावाला अनुसरून तुम्ही कठीण प्रसंगांवर आणि फसवेगिरीवर मात कराल.<br>• *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ◦ जोडीदाराची उत्तम साथ लाभेल.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  ◦ एजेंट व व्यावसायिक सल्लागार वित्तीय वृध्दी घडवून आणतील.<br>  ◦ नव्या योजनांची कामे हाती घेतली जातील.<br>  ◦ शेतीची जमीन घेण्याचे योग आहेत.<br>• *इ . कौटुंबिक*<br>  ◦ मुलं उत्तम कामगिरी करतील. आईची तब्येत सांभाळा.<br>  ◦ भावंडात थोडासा कलह असेल पण तसे एकमेकांबाबतीत प्रेम दर्शवतील.<br>  ◦ मोठे थोरले मदत करतील.<br>  ◦ घरात विवाह सोहळा होईल.<br>• *फ . परदेश गमन*<br>  ◦ नोकरीतून परदेश गमन होण्याची शक्यता.<br>  ◦ परदेश गमनास सर्व योग जुळून येतील.<br>  ◦ फक्त क्रोधावर ताबा ठेवा. काही महिला मदत करतील. |
| **२.४ कर्क राशी (Karka):**<br> | • *अ. स्वास्थ्य*<br>  ◦ शनी-मंगळ ग्रहयुती विचित्र परिस्थिती निर्माण करेल.<br>  ◦ दगडाखाली हात अडकला अशी विवंचना होईल.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>  ◦ सूर्यग्रहणाजवळ कामगार अस्वस्थ असतील.<br>  ◦ भांडण तंट्याचे योग. हितशत्रूंचा त्रास. |

| | |
|---|---|
| | • नको तिथे बदली होण्याची शक्यता.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  • साथीदार मदत करेल.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  • तुमचे वित्तीय सल्लागार मात्र सर्व सांभाळून घेतील.<br>• *इ . कौटुंबिक*<br>  • घरातील वृद्धांशी मतभेद टाळा.<br>• *फ . परदेश गमन*<br>  • ग्रहणात परदेशी व्यवहारात नाव खराब होण्याची शक्यता आहे. |
| **२. ५ सिंहराशी (Simha):**<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>  • सूर्यग्रहणाजवळ शारीरिक वेदना होण्याची शक्यता.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>  • भागीदारीतून कटकटी होतील. घरी व द्वारी विरोध होईल. OK<br>  • स्वतंत्र व्यवसायिकास वसुलीत यश मिळेल.<br>  • पूर्वार्धात ग्रहणाजवळ अपघात टाळा.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  • जोडीदाराशी भांडण तंटा करू नये.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  • काही विशिष्ट गुंतवणुकीत यश मिळेल.<br>• *इ . कौटुंबिक*<br>  • आई वडील सुद्धा विरोधात जातील.<br>• *फ . परदेश गमन*<br>  • शनी-मंगळ अडथळे निर्माण करतील.<br>  • उत्तरार्धात मात्र परदेशी सहज जाल. |
| **२. ६ कन्या राशी (Kanya):**<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>  • मधुमेह सारखे रोग किंवा चरबीचे रोग सतावतील. तसेच दीर्घकालीन आजार चिघळतील.<br>  • सूर्यग्रहणाजवळ दुखापती होण्याची शक्यता.<br>  • चेहेऱ्यावर उदासीनता दाखवू नका.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>  • दीर्घकालीन कार्य उत्तम बजावलं तर कलह कमी होतील.<br>  • राजकीय शत्रू त्रास देतील. |

| | |
|---|---|
| | • *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ◦ संशय कल्लोळ टाळा. तुमच्या जोडीदाराच्या कलाकलाने घ्या.<br>  ◦ उत्तरार्ध वैवाहिक जीवनात जल्लोष करणारा.<br>  ◦ भागीदाराचा भाग्योदय होईल.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  ◦ शेतीची जमीन मिळून फायदा होईल. सतत खर्च होतील.<br>• *इ . कौटुंबिक*<br>  ◦ आईची तब्येत उत्तम असेल. मुलांना यश आहे. कुटुंबात आनंद असेल.<br>  ◦ वृद्धांना दुखापत होण्याची शक्यता.<br>• *फ . परदेश गमन*<br>  ◦ बरेच अडथळे येतील. |
| २.७ तूळ राशी (Tula):<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>  ◦ स्वास्थ्य बरे असेल पण ग्रहणाच्या वेळेस पथ्य पाळावे. दान करावे.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>  ◦ धंद्यात मोठा फायदा होईल.<br>  ◦ सूर्यग्रहणाजवळ शंकास्पद व्यवहार टाळावे.<br>  ◦ पौर्णिमेला गुप्त चिंता सतावेल.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ◦ जोडीदाराची उत्तम साथ मिळेल.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  ◦ जमिनी व स्थावर जंग मालमत्ता कोर्ट कचेरी प्रकरणात गुंतेल<br>• *इ . कौटुंबिक*<br>  ◦ तरुणांनी उत्सव आणि प्रेम प्रकरणे, वाईट संगती टाळावीत.<br>  ◦ आई वडिलांची तब्येत ठीक असेल.<br>• *फ . परदेश गमन*<br>  ◦ काही बाधा नसल्यास परदेशी जाल. |
| **२. ८ वृश्चिक राशी (Vrishchika):**<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>  ◦ मानसिक, शारीरिक पथ्ये पाळा.<br>  ◦ अमावस्या मात्र दुखापतीची असेल.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>  ◦ वाईट योग वाढतील. |

| | |
|---|---|
| | ● आर्थिक घटकांतून पथ्ये पाळा.<br>● नवीन नोकरी मिळेल.<br>● *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>● पूर्वार्ध तरुणांचे नैराश्य घालवेल.<br>● *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>● ग्रहणाजवळ सल्लागारांचे मत घ्या.  नाही तर नुकसान होऊ शकते.<br>● *इ . कौटुंबिक*<br>● जवळच्या नातेवाईकांची शस्त्रक्रिया होण्याची शक्यता.<br>● धावपळीचे दिवस असतील. लागल्यास आईला मदत करा.<br>● घरी राजकारण टाळा. भाऊबंदकीचा त्रास होऊ शकतो.<br>● *फ . परदेश गमन*<br>● नोकरीतून परदेशी जाल. |
| **२. ९ धनू राशी (Dhanu):**<br><br> | ● *अ. स्वास्थ्य*<br>● गुरूच्या कृपेने स्वास्थ्य उत्तम असेल. उत्तरार्ध अजूनच उत्तम जाईल.<br>● मात्र हातापायाला इजा होऊ नये याची काळजी घ्या.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>● पूर्वार्धात तुमच्या कामाचा उदो उदो होईल. पुढे थोडे क्लिष्ट काम हाती येईल.<br>● तरुण मंडळींचे भाग्योदय व पौर्णिमा धनवर्षावाची.<br>● *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>● जोडीदाराची साथ लाभेल.<br>● *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>● सूर्यग्रहणा जवळ सुवार्ता येण्याची शक्यता.<br>● खरेदी विक्रीतून लाभ होईल.<br>● *इ . कौटुंबिक*<br>● थोडासा कलह टाळला तर भाऊ बहिणीशी उत्तम जमेल.<br>● घरात कार्य घडतील.<br>● *फ . परदेश गमन*<br>● शनी मंगळ युती मुळे योग नाही. पुढच्या मासात बघा. |
| **२. १० मकर राशी (Makar):** | ● *अ. स्वास्थ्य* |

<table>
<tr>
<td>
</td>
<td>
<ul>
<li><ul><li>घरात शस्त्रक्रिया किंवा आजार होण्याची शक्यता. डोळ्यांची काळजी घ्या.</li></ul></li>
<li><u>ब . नोकरी/धंदा</u>
<ul>
<li>सूर्यग्रहणा जवळ भलत्या सलत्यांशी गाठी-भेटी होतील. थोडा वाद होईल.</li>
<li>शनी - मंगळ मुळीच साथ देणार नाहीत.</li>
</ul></li>
<li><u>क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे</u>
<ul>
<li>जोडीदाराची उत्तम साथ मिळेल.</li>
</ul></li>
<li><u>ड . वित्त/ गुंतवणुकी</u>
<ul>
<li>व्यावसायिक धनलाभ होईल. सरकारी कामे होतील.</li>
<li>जमीन जुमल्या बाबतीत लाभ दर्शवितो.</li>
</ul></li>
<li><u>इ . कौटुंबिक</u>
<ul>
<li>सूर्य ग्रहणाच्या आसपास देण्या-घेण्यातून वाद घालू नका.</li>
<li>कौटुंबिक सोहोळा होईल. आई वडिलांची तब्येत उत्तम असेल.</li>
</ul></li>
<li><u>फ . परदेश गमन</u>
<ul>
<li>थोडा त्रास होईल पण परदेशी जाल.</li>
</ul></li>
</ul>
</td>
</tr>
<tr>
<td>२. ११ कुंभ राशी (Kumbha):<br>
</td>
<td>
<ul>
<li><u>अ. स्वास्थ्य</u>
<ul>
<li>आरोग्य विषयक पथ्ये पाळा. डोळे तपासून घ्या.</li>
<li>सूर्यग्रहण बघताना डोळ्यांची काळजी घ्या.</li>
</ul></li>
<li><u>ब . नोकरी/धंदा</u>
<ul>
<li>कायदेशीर बाबी सांभाळा.</li>
<li>शनी-मंगळ एक विशिष्ठ आचार संहिता लावेल.</li>
<li>तसे बदल घडू द्या.</li>
</ul></li>
<li><u>क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे</u>
<ul>
<li>सूर्यग्रहणा जवळ स्त्रीविरोध होण्याची शक्यता. तिला समजून घ्या.</li>
</ul></li>
<li><u>ड . वित्त/ गुंतवणुकी</u>
<ul>
<li>मानसिक दबाव वाढेल.</li>
</ul></li>
<li><u>इ . कौटुंबिक</u>
<ul>
<li>ग्रह स्तिथी घरात आनंदी वातावरण ठेवेल.</li>
</ul></li>
<li><u>फ . परदेश गमन</u>
<ul>
<li>नक्कीच परदेशी जाल.</li>
</ul></li>
</ul>
</td>
</tr>
</table>

| | |
|---|---|
| **२.१२ मीन राशी (Meena):**<br><br> | • *अ. स्वास्थ्य :*<br>  • पूर्वार्धात उत्तम स्वास्थ्य लाभेल.<br>  • उत्तरार्धात मात्र कापणे, भाजणे, शस्त्रक्रिया होण्याची शक्यता.<br><br>• *ब . नोकरी/धंदा*<br>  • गुरूची कृपा असून, नोकरी धंदा उत्तम चालेल.<br>  • सूर्यग्रहणाजवळ कामगार पीडा असेल.<br>  • नुकसान बघण्याची तयारी ठेवा.<br>  • कुयोग असूनही शुभ ग्रह उत्तम साथ देतील.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  • हा महिना थोडा रटाळ आणि शुष्क असेल.<br>  • कलहाची शक्यता आहे.<br>  • वैयक्तिक कलासाधना उजळतील.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  • उत्तरार्धात उत्तम गुंतवणुकी होतील.<br>  • जमीन जुमला बाबतीत अडचणी येत असतील पण वरीष्ठ अधिकारी मदत करतील.<br>  • उधार उसनवारी करताना जपून.<br>• *इ . कौटुंबिक*<br>  • भावंडात वाद टाळा.<br>• *फ . परदेश गमन*<br>  • या महिन्यात हा योग कमी पण जुन्या कंत्राटाद्वारे परदेशी जायची शक्यता आहे. |